Reg. No. MCS/069/2018-20 R. N. I. Reg. No. 1591/57
मुंबई, पुणे, नागपूर, अहमदनगर, औरंगाबाद आणि दिल्ली येथून प्रसिद्ध
मुंबई, बुधवार, ४ जुलै २०१८
लोकसत्ता
लोकमान्य, लोकशक्ती !

तापमान कमाल ३०°सें किमान २४°सें

हवामानाचा अंदाज
जोरदार सरींची शक्यता.

LOKSATTA.COM FACEBOOK.COM/LOKSATTALIVE TWITTER.COM/LOKSATTALIVE LOKSATTA.COM/APPS

# कामगार पाल्यांना स्पर्धा परीक्षांचे मार्गदर्शन

**महाराष्ट्र कामगार** कल्याण मंडळातर्फे कामगार पाल्यांसाठी राज्यात लवकरच स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण वर्ग सुरू करण्यात येणार आहेत. मंडळाच्या केंद्रांमध्ये हे वर्ग सुरू होणार आहेत. यात यूपीएससी, एमपीएससी यासह बँकिंग, पोलीस, तलाठी, लिपिक, स्टाफ सिलेक्शन अशा सर्व महत्त्वाच्या सरळसेवा भरती परीक्षांचा समावेश आहे. पाल्यांनी मंडळाच्या नजीकच्या केंद्रात जाऊन सदर वर्गासाठी नोंदणी करावयाची आहे. नोंदणीनुसार त्या-त्या केंद्रांतून स्पर्धा परीक्षा वर्ग सुरू केले जाणार आहेत. केंद्रांचे सविस्तर पत्ते मंडळाच्या www.lwb.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. परीक्षेच्या अभ्यासक्रमानुसार २ महिने ते ८ महिने कालावधीचे वर्ग असणार आहेत. यूपीएससी मार्गदर्शन वर्गासाठी विद्यार्थ्यांकडून नाममात्र ५०० आणि एमपीएससी वर्गासाठी २५० रुपये शुल्क आकारले जाईल. प्रत्येक विद्यार्थ्याचा अभ्यासक्रम साहित्य, चाचणी मालिकेचा खर्च मंडळ करणार आहे. ३० टक्के जागा मुलींसाठी राखीव आहेत, असे मंडळाच्या वतीने कळविण्यात आले आहे.

लोकसत्ता Wed, epape